# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

प्रत्र क्र.रासेयो/१६९/२०१३—१४
दिनांक :— १३/०५/२०१३.

प्रति,
...............................,
...............................,
...............................,

विषय : राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत.

संदर्भ : क्र. रासेया—२०१३/सं.क्र.२०७/१३/साशि—७ दि. २३ एप्रिल, २०१३

मा. महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भ पत्रातील राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या विषयावर हिंदू जनजागृती समितीने जनहित याचिका क्र. १०३/२०११ दाखल केली असून राष्ट्रध्वजाचा अवमान होत असल्याची दखल मा. उच्च न्यायालयाने घेतली आहे.

सर्वसाधारणपणे प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, इतर राष्ट्रीय कार्यक्रम तसेच विशेष प्रसंगी कागदी तसेच प्लास्टिक निर्मित राष्ट्रध्वजाचा वैयक्तिकरित्या वापर केला जातो. अशा कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज इतस्ततः पडलेले दिसून येतात. प्लास्टिक निर्मित ध्वज बरेच दिवस नष्ट होत नसल्याने व राष्ट्र प्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंबीर असल्याने केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकच्या वापरास मान्यता नाही. याशिवाय खराब झालेले व इतस्ततः पडलेले राष्ट्रध्वज ध्वज संहितेमधील तरतुदींनूसार नष्ट करणे आवश्यक आहे. सबब, राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये यासाठी तसेच राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही या करिता आवश्यक कार्यवाही करण्याचा सुचना आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांना देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे राष्ट्रध्वजासंदर्भातील सर्व अधिनियमांच्या तरतूदी, या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी असेही सर्व संबंधीतांना कृपया कळविण्यात यावे.

आपला विश्वासु,

डॉ. अतुल हं. साळुंके
प्रभारी कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग